# डॉ. स्वामीनाथन यांचे शेती व्यवस्थेत अमूल्य योगदान..!

## डॉ. सुफला पुजारी : साखळी सरकारी महाविद्यालयात संशोधन दिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड



साखळी : मुख्य मार्गदर्शक डॉ. सुफला पुजारी यांच्यासोबत प्रा.शुभा कवठणकर, प्रा. अंकिता वेर्णेकर व विद्यार्थी वर्ग.

**पर्वरी, दि. १९ :** भारतीय शेती व्यवस्थेत अमूलाग्र परिवर्तन घडवून आणून देशातील अन्न धान्याच्या टंचाईवर मात करण्याचे महान कार्य डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी केले. त्यामुळेच त्यांना भारतातील हरित क्रांतीचे जनक म्हटले जाते, त्यांनी शेती व्यवस्थेत अमूल्य योगदान दिले, असे प्रतिपादन कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापिका डॉ. सुफला पुजारी यांनी केले.

महाविद्यालयाच्या संशोधन आणि विकास कक्षाने अलीकडेच डॉ.एम.एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या सन्मानार्थ आणि संशोधन दिनाच्या उत्सवाचा एक भाग म्हणून डॉ. एम.एस.स्वामीनाथन भारतातील हरित क्रांतीचे अग्रदूत या विषयावर आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानात डॉ. सुफला पुजारी बोलत होत्या.

यावेळी प्रा.रोझालिना डिसिल्वा, प्रा. शुभा कवठणकर, प्रा. अंकिता वेर्णेकर आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. पुजारी म्हणाल्या की, संकरित पिकावरील काम आणि पारंपरिक शेती ज्ञानासह आधुनिक वैज्ञानिक तंत्रांचे एकत्रीकरण यांसारख्या डॉ. स्वामीनाथन यांच्या नवकल्पनांनी १९६० नंतर भारतातील कृषी उत्पादकता वाढविण्यास हातभार लावला.

अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जातीच्या विकासात मध्यवर्ती भूमिका बजावणाऱ्या वनस्पती अनुवंशशास्त्रातील डॉ. स्वामीनाथन यांच्या अग्रगण्य कार्यावर डॉ. सुफला पुजारी यांनी प्रकाशझोत टाकला. शाश्वत शेती पद्धतीसाठी डॉ. स्वामीनाथन यांनी केलेल्या संशोधनामुळे पिकांच्या लागवडीत क्रांती घडली.

शाश्वत शेती आणि पर्यावरण संवर्धनाची भूमिका जपतानाच जैवविविधता, माती आरोग्य आणि जलसंवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी राबविलेल्या डॉ. स्वामीनाथन यांच्या कार्याचा आढावादेखील डॉ. पुजारी यांनी यावेळी घेतला.

पान १ वरून

### वन्यजीव अभयारण्यात लोहखनिज हाताळणीस विरोध

दक्षिण पश्चिम रेल्वे आणि वेदांतचा हा पर्यावरणाला हानिकारक प्रस्ताव त्वरित नाकारण्यात यावा अशी मागणी सेव्ह मोलेने केली आहे. जैवविविधतेने समृद्ध असलेल्या गोव्याच्या जंगलांचे रक्षण करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी भूमिका गटाने मांडली आहे. गुरुवारी होणाऱ्या बैठकीत या प्रस्तावावर होणारा निर्णय पर्यावरणीय संरक्षण आणि औद्योगिक उपक्रम यामधील संतुलन ठरवणारा ठरणार आहे.

### सुनीता विल्यम्सचे ९ महिन्यांनंतर पृथ्वीवर यशस्वी पुनरागमन

या दरम्यान, फास्ट बोट्सनी समुद्रात तरंगणारी पॅराशूट्स आणि इतर उपकरणे संकलित केली. कॅप्सूल सुरक्षित असल्याची खात्री पटल्यानंतर रिकव्हरी जहाज मेगन ने कॅप्सूलला जोडले आणि त्याला प्लॅटफॉर्मवर ठेवले. ड्रॅगन फ्रीडमच्या बाहेरील बाजूला साचलेले खारे पाणी गोड्या पाण्याने स्वच्छ करण्यात आले. नंतर कॅप्सूलमधील साईड हॅच उघडून वैद्यकीय टीमने अंतराळवीरांची प्राथमिक तपासणी केली. प्रथम नासा अंतराळवीर निक हेग, नंतर रशियन अंतराळवीर अलेक्झांडर गोर्बोनॉव्ह आणि शेवटी सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना बाहेर काढण्यात आले. सर्व अंतराळवीरांना स्ट्रेचरवर ठेवून प्राथमिक वैद्यकीय तपासणीसाठी हलवण्यात आले. हे दोघे नऊ महिने शून्य गुरुत्वाकर्षणात होते, त्यामुळे स्नायू आणि हाडांवर परिणाम झाला असल्याची शक्यता आहे. प्राथमिक तपासणीनंतर अंतराळवीरांना ह्यूस्टन येथे नेण्यात येणार असून तिथे ते आपल्या कुटुंबीयांना आणि मित्रपरिवाराला भेटणार आहेत.

# शिमगोत्सव गोव्याचे सांस्कृतिक संचित

## आमदार डॉ. शेट्ये श्रीफळ ठेवून घेतले देवतांचे आशीर्वाद

■ टीम दैनिक हेराल्ड


डिचोली : शांतादुर्गा मंदिरात श्रीफळ ठेवून शिमगोत्सवासाठी देवतांचे आशीर्वाद घेताना अध्यक्ष आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये. सोबत नगराध्यक्ष विजय कुमार नाटेकर, नगरसेवक, समितीचे पदाधिकारी.

**डिचोली, दि. १९ :** पारंपरिक शिमगोत्सव हे गोव्याच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवणारे संचित असून सर्व लोक या उत्सवात गुण्यागोविंदाने सहभागी होऊन वेगळा आनंद अनुभवतात.

उद्या गुरुवारी डिचोलीत होणाऱ्या शिमगोत्सव मिरवणुकीस मोठ्या संख्येने सहभागी होऊन आनंद द्विगुणीत करावा, असे आवाहन डिचोली शिमगोत्सव समितीचे अध्यक्ष आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी केले.

शिमगोत्सवनिमित्त समितीतर्फे श्री शांतादुर्गा मंदिर कोटेश्वर देवस्थान, शांताराम मठ मंदिर आदी ठिकाणी देवतांना श्रीफळ ठेवून सांगणे घालून आशीर्वाद घेण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर तसेच नगरसेवक, समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्या गुरुवारी सायंकाळी साडेचार वाजता बोर्डे येथे श्री वडेश्वराच्या चरणी श्रीफळ ठेवून गाऱ्हाणं घालून शिमगोत्सव मिरवणुकीस सुरुवात होणार असून चित्ररथ, रोमटामेळ लोकनृत्य, वेशभूषा स्पर्धा व मिरवणूक होणार आहे तसेच विविध गटातील वेशभूषा स्पर्धा सायंकाळी पाच वाजता छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर होणार आहे

या सर्व मिरवणूक व स्पर्धांना सर्वांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन उपस्थित रहावे. तसेच सर्वांनी वेळेचे बंधन पाळावे, असे आवाहन शिमगोत्सव समितीतर्फे करण्यात आले आहे शिमगोत्सव मिरवणुकसाठी वाहतुकीत बदल करण्यात आला असून उद्या दि. २० मार्च रोजी सायंकाळी ५ वाजल्यापासून बायपास रस्त्यावरून वाहतूक वळवण्यात येणार असून मार्केट पॉईंट कडे वाहने नेता येणार नाहीत.

# वळवईत शिवरायांचा जयघोष

- शिवजयंती उत्सव भरगच्च कार्यक्रमांनिशी साजरा
- सिंधूगर्जना ढोल ताशा पथक ठरले खास आकर्षण

■ टीम दैनिक हेराल्ड



**सावईवेरे, दि. १८ :** वळवई येथील श्री शिव छत्रपती प्रतिष्ठानतर्फे तारी सोसायटी, श्री गजांतलक्ष्मी संस्थान आयोजित तसेच गोवा पर्यटन संचालनालय पुरस्कृत दोन दिवसीय तिथीनुसार शिवजयंती उत्सव भरगच्च कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. वळवईत दोन दिवस शिवरायांचा जयघोष करीत वळवई गावात शिवमय व चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. यानिमित्त रंगखांब ग्रुप कणकवली प्रस्तुत 'जयजयकार छत्रपतींचा ', सिंधूगर्जना ढोल ताशा पथक कणकवली,महिलांचे लेझीम पथक हे कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले.

दिलीप नाईक यांच्या हस्ते या उत्सवाचे उद्घाटन झाले.त्यानंतर अखिल गोवा पातळीवर लहान व मोठ्या गटात ऐतिहासिक विषयावर वेशभूषा स्पर्धा संपन्न झाली.या स्पर्धेनंतर रंगखांब ग्रुप कणकवली प्रस्तुत 'जयजयकार छत्रपतींचा ' हा बहारदार कार्यक्रम झाला. महाराजांची गाणी, तलवारबाजी, लाठी काठी , पोवाडा, पारंपरिक वाद्य या कार्यक्रमाबरोबरच करपल्लवी या गुप्त भाषा कलेचं तसेच स्वतः छत्रपती व बहिर्जी ज्या भाषेमध्ये बोलत होते , अशा दुर्मिळ कलेचे उत्तम सादरीकरण झाले.

सोमवारी छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीचा प्रारंभ मुरगावचे आमदार संकल्प आमोणकर यांच्या हस्ते करण्यात आला. श्री म्हारू देवस्थान ते श्री गजांतलक्ष्मी देवस्थानपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात लेझीम व ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. येथील शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास मानवंदना देण्यात आली. त्यानंतर रात्री वळवई महिला वर्गातर्फे सुंदर लेझीम सादरीकरण झाले. यावेळी कणकवलीच्या सिंधूगर्जना ढोल ताशा पथकाने ढोल ताशांचे उत्कृष्ट सादरीकरण करीत वाहवा मिळविली. यानंतर समारोप सोहळा पार पडला.

या सोहळ्यास व्यासपीठावर जिल्हा पंचायत सदस्य श्रमेश भोसले, सरपंच विनायक वेंगुर्लेकर, उपसरपंच मिताली शेट, पंच सदस्य अंजली वेंगुर्लेकर, काशिनाथ नाईक, सर्वेश नाईक,देवस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर तारी,प्रतिष्ठानचे अध्यक्ष रत्नाकर तारी , नुनु तारी , सुरेंद्र वळवईकर,निता तारी उपस्थित होते. श्रमेश भोसले यांनी शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

# केपे महाविद्यालयात व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा उत्साहात

## एनएसएस आणि प्राणीशास्त्र विभागाचा पुढाकार; मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड



केपे : व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेत बोलताना प्राचार्य डॉ प्रवीणा केरकर. सोबत मान्यवर.

**केपे, दि. १९ :** गोवा राज्य युवा धोरण २०१५ च्या अंमलबजावणी अंतर्गत आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त पणजी येथील क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाच्या सहकार्याने कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय केपे येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि प्राणीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विकास जनहित या संकल्पनेंतर्गत एक दिवसीय व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.

या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रवीण काकोडे आणि वैभवी नाईक यांनी मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर, एनएसएस विभागप्रमुख डॉ. राजेंद्र कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रवीण काकोडे, वैभवी नाईक यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास करण्याचे मार्ग आपल्या मनोगतातून सांगितले. यावेळी एनएसएस विभागातील किरण प्रकाश नाईक, अल्पिता सावंत देसाई, शबनम शेख, लविना फर्नांडिस, विशाल नाईक, शीना पॉल, ज्युलियाना सिल्वेरा, सुवेनी गोम्स आदींनी कार्यशाळेच्या संयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. सूत्रसंचालन प्रा. सुवेनी गोम्स यांनी केले. तर एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.किरण नाईक यांनी आभार मानले.

विकास जनहित या संकल्पनेंतर्गत एक दिवसीय व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेत महाविद्यालयातील १०० स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली. कार्यशाळेतील सर्व सत्रे परस्परसंवादी आणि ज्ञानवर्धक होती. ज्यामधून व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले गेले.

### यशस्वी होण्यासाठी कौशल्ये आत्मसाद करा : प्राचार्य केरकर

**सद्य काळातील वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या आधारे आवश्यक कौशल्ये आत्मसाद केल्यास विद्यार्थी नक्कीच यशस्वी होतील, असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर यांनी केले. विद्यार्थ्यांनी स्वत:मधील नेतृत्व कौशल्य वाढविण्यासाठी मिळालेल्या प्रत्येक संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन ही यावेळी प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर यांनी केले.**

# केरीत विहिरीत पडून रानडुकराच्या १० पिल्लांचा मृत्यू

टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. १९ :** मधलावाडा केरी येथे एका विहिरीत पडून रानडुकराच्या दहा पिलांचा मृत्यू झाला. काल मंगळवारी रात्री उशिरा ही पिल्ले विहिरीत पडली. या घटनेची माहिती तुये येथील वनखात्याच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यांनी घटनास्थळी दाखल होत पाहणी केली. घटनेचा पंचनामा करून, आत पडलेल्या सर्व पिलांना बाहेर काढले. त्यानंतर त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. पाण्याच्या शोधात निघालेल्या या पिलांना विहिरीचा अंदाज न आल्याने आत पडली असावीत असा प्राथमिक अंदाज वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**Transfer of Vehicle**

I Shantava Uday Bagogi, (Marriage Certificate unavailable as marriage registration not done) r/o Khorlim, Mapusa, Goa wish to transfer the Eisher commercial vehicle bearing registration No. GA 03 W 1108 & permit, also Activa Scooter bearing registration no. GA 03 AD 6768 in my name which was registered in the name of my late husband Uday Bagogi.

Any person is / are having any objection to the said transfer of vehicle / permit, should submit the same to and Asst. Director Transport, Mapusa, within 15 days of publication of the notice.

**CHANGE IN NAME**

I, **MARIA LUDOVINA FERNANDES,** resident of H.NO.1359 Corjem Curtorim South Goa, 403709, would like to change my name from **LUDOVINA BORGES** to **MARIA LUDOVINA FERNANDES.** Hereafter in all my dealings & documents, I will be known by my name **MARIA LUDOVINA FERNANDES.**

**VILLAGE PANCHAYAT DHARGALIM, PERNEM – GOA**

Ref.No.VP/DHA/PER/Q. NOTICE/2024-25/ 3526 Date: 13/03/2025

**QUOTATION NOTICE**

The Sarpanch of this V.P. Dhargalim, Pernem – Goa on behalf of V.P. Dhargalim, Pernem – Goa invites the sealed Quotations from interested suppliers so as to reach in the office on or before **28/03/2025 upto 10.30 a.m.** for supply of following items/goods including GST for Village Panchayat Dhargalim Pernem Goa (for FY- 2025-26).

| Sr.No | Item / Description | Quantity |
|---|---|---|
| 1. | Supply garbage storage bags to V. P. Office, V. P. Dhargalim<br>Size: 1) 30 x 40<br>2) 40 x 50 | Per unit |
| 2. | Supply of Office use Stationary | Per unit |
| 3. | Supply of Printed Office use Registers/Forms | Per unit |

**TERMS AND CONDITIONS ARE AS FOLLOWS:-** **1.** The quotations shall reach this Office on or before **28/03/2025 up to 10.30 a.m.** and same will be opened on **28/03/2025 at 11:00 a.m.** onwards and the lowest quotation will be accepted. **2.** The rate shall be quoted per item and should be inclusive of all taxes with transportation door delivery. **3.** Quotation shall be supplied alongwith the GST Registration Number. **4.** The Panchayat reserves the right to accept or reject all quotations without giving any reasons thereof to the dealer or suppliers.

Place: Dhargalim, Pernem Goa.
Date: - 13/03/2025.
Seal
Sd/- [ Mr. Satish C. Dhumal ] Sarpanch,
Village Panchayat Dhargalim, Pernem – Goa.

**धारगळ ग्रामपंचायत, पेडणे–गोवा**

फोन नं. 9359580520, ईमेल– vpdhargalim@rediffmail.com

Ref. No. VP/DHA/PER/AUCTION NOTICE/2024-25/3527 Date: 13.03.2025

**जाहीर लिलाव सूचना**

ग्रामपंचायत धारगळ क्षेत्रातील सर्व लोकांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत धारगळ कार्यक्षेत्रात **01.04.2025** ते **31.03.2026** अखेरपर्यंत होणाऱ्या जत्रा, नाटक व इतर उत्सव प्रसंगी तसेच विक्रेत्यांकडून बाजार शुल्क /कर गोळा करण्याचा ठेका घेण्यासाठी शुक्रवार दिनांक **28/03/2025** रोजी दुपारी **12.00** वाजता ग्रामपंचायत धारगळ सभागृह येथे जाहिर पावणी पुकारण्यात येणार आहे, तेव्हा इच्छुक बोलीदाराने सदर दिवशी पावणी मिळविण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात हजर रहावे.

| क्र. | पावणीचे लिलावाचे स्वरुप | प्रथम बोली | इशारा रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | बाजार फी/जत्रा फी (सोपो) | रु. 1,33,200/- | रु. 1000/- |

**अटी व नियम:**

1) लिलावात भाग घेणारी व्यक्ती ही धारगळ गावची ग्रामस्थ असली पाहिजे.
2) या जाहिर लिलावात भाग घेणारी व्यक्ती धारगळ पंचायतीस कसलीच थकबाकीदार असता कामा नये.
3) या जाहिर लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीने आपली इशारा रक्कम (परत न मिळणारी) या कार्यालयात त्याच दिवशी सकाळी 11.45 पर्यंत जमा केली पाहीजे.
4) पावणीदाराने पंचायतीने ठरवून दिलेल्या दरपत्रकानुसार कर फी वसुली केली पाहिजे
5) प्रत्येक कर दात्यास/ फेरीवाल्यास पावती देऊन कर फी वसुली करणे पावणीदारास अनिवार्य आहे.
6) पंचायतीने ठरवून दिलेल्या दरपत्रकापेक्षा जास्त कर फी वसुली पावणीदाराने केल्याचे पंचायतीच्या निदर्शनास आल्यास पावणीदाराविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल.
7) जाहिर लिलावात बोलीच्या स्वरुपात ठरली जाणारी रक्कमेच्या 50% रक्कम त्याच दिवशी जमा केली पाहिजे व उरलेली रक्कम दोन दिवसांच्या आत जमा केली पाहिजे त्यास मुदतवाढ मिळणार नाही.
8) ठेकेदारास पावणी देणे अथवा न देणे हा हक्क पंचायत राखून ठेवत आहे.

स्थळ: धारगळ.
दिनांक: 13.03.2025
(सतीश चं. धुमाळ)
सरपंच, ग्रामपंचायत धारगळ.
पेडणे गोवा

**IN THE COURT OF JOINT MAMLATDAR-I OF BARDEZ AT MAPUSA- GOA.**
**Mutation Case No. 100511**
**Village: Nachinola**

1. Sangam Patil, r/o. 83-84 Huda Hieghts Shant Saroj Nilaya, Road No. 12, Banjara Hills, Khairatabad, Banjara Hills, Hyderabad, Andra Pradesh. 500034 .... Applicant

V/S

1. Benedicta Cheryl D Costa alias Benedicta Cheryl D'Costa alias Benedicta Cheryl Dcosta 2. Christopher Anthony D'Costa alias Christopher D'Costa alias Christopher DCosta 3. Craig Dcosta 4. Oswald Anthony D. D'Costa alias Oswald Anthony D. Dcosta alias Oswald Anthony Sunil D'Costa alias Sunil D'Costa alias Oswald D' Costa alias Oswald A.S. D'Costa alias Sunil Oswald D'Costa .... Opponents

**PUBLIC NOTICE**

To The above name Opponents/Legal heirs if any/interested parties if any.

Whereas the applicant Sangam Patil, r/o. 83-84 Huda Hieghts Shant Saroj Nilaya, Road No. 12, Banjara Hills, Khairatabad, Banjara Hills, Hyderabad, Andra Pradesh, 500034, has applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include the name in occupants column under Sy. No. 32/1-C of Village Nachinola, Taluka Bardez, after deleting the existing name of Benedicta Cheryl D'Costa , as per Deed of Sale, Registration Number BRZ-1-6041-2024, dated 08-11-2024, Book 1 Document, Document Serial No. 2024-BRZ-6281, executed Civil Registrar Cum-Sub Registrar of Bardez and Inventory Proceeding No. 567/2021/A, dated 03-01-2023, in the Court of the AD-HOC Civil Judge, Senio r Division, 'A' Court, at Mapusa, Goa.

AND WHEREAS, the notice in form No. X were generated to be served to the party by registered A/D. Party was unserved with postal remark as unserved, insufficient address, Party expired etc hence to be served through alternative means and so the notices are prayed to be served by way of publication in local newspaper.

AND WHEREAS, the applicant have prayed vide their application for substitute service, by publication of public notice in any one newspaper as required under order V Rule 20(1A) of C.P.0 as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to submit to me their objection if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notices failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying Officer.

**Dated: 18-03-2025** SEAL
**Sd/- (Devanand P. Prabhu)**
**Joint Mamlatdar-I of Bardez Mapusa-Goa**

**VILLAGE PANCHAYAT, MERCES**
Tiswadi, Merces - Goa.
P. O. St. Cruz - 403005
Phone:7410523636
**Our Ref. No. VP / MER /283/2024-25**
Date: 18/03/2025

**NOTICE INVITING QUOTATION**

Sealed quotations are invited on behalf of Village panchayat Merces Tiswadi-Goa from the eligible contractors/Supplier/ Dealer, for supply of below mention items.
1. Hiring of Vehicle for Transportation of Garbage from MRF Shed Merces Village to Saligao Treatment Plant.
2. Purchase of Electric Two Wheeler for V. P. Merces.
3. Purchase of Document Scanner for V.P Merces Office.
4. Supply of Printed & Office Stationary- for V.P office for the year 2025-2026.
5. Supply of Waste Collection bags.

The sealed quotation should reach in this office on 29/03/2025 before 11.00 a.m and it will open on 29/03/2025 at 3.30 p.m onwards. In presence of authorized Contractor/Dealer/ Supplier if any.

**TERMS AND CONDITIONS**

1. The quotation should accompany with Pan Card Copy. GST Certificate.
2. For complete details and specification of above the dealer /supplier/Agencies should approach in V.P office Merces.
3. The right to reject any or all quotation received is reserved by Village Panchayat Merces.
4. The rates quoted in the quotation should be inclusive of all types of taxes payable to the Government.
5. The supplier should supply the mentioned goods in the V.P Office within seven days from the date of receipt of the supply order.
6. The rate for hiring of vehicle for transportation of garbage from MRF shed Merces village to Saligao treatment plant should be per trip.
6. No separate transport charges will be paid for delivery of goods to Village Panchayat office.

Given under the seal of this office on this 18lh day of March 2025

SEAL Sd/- **(Sushant Govekar)**
Sarpanch